मजकुरः—

दिनांक ०२/०४/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ’’** माहे नोव्हेंबर —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर —२०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | सपोआ. डी. स्पेशल , गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई | गु.प्र.शा, गु.र.क्र. ८६/२०२४ कलम १०३(१), १०९, १२५, ३(५), ३३६(२), ३३७, ६१(२), २३८ भा.न्या. सं. २०२३ सह कलम ३, ५, २५, २७ भा. ह. का. सह कलम ३७, १३५ म. पो. का. सह कलम ३ (१) (प), ३ (२), ३ (३), ३ (४) मोक्का कायदा |

“ जीवे ठार मारणे. ’’

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— दिनांक १२/१०/२०२४ रोजी एका अनोळखी इसमाने फटाका सदृश्य वस्तु फोडुन व इतर दोन अनोळखी इसमांनी माजी मंत्री मा.श्री झियाउद्दीन अब्दुल रहीम सिद्धीकी उर्फ बाबा सिद्धीकी यांच्यावर अग्नीशस्त्रातुन अंदाधुंद गोळीबार करून त्यांना जीवे ठार मारले. सदर गोळीबारामध्ये तेथील एक इसम देखील गंभीर जखमी झाला. त्यावरून तीन अनोळखी इसमांनी अज्ञात कारणावरून गोळीबार करून केला अशी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री.श्याम मगन सोनवणे, |
| गुन्हा घडला दिनांक | | दि. १२/१०/२०२४ रोजी |
| गुन्हा दाखल दिनांक | | दि. १३/१०/२०२४ रोजी |
| मयत इसम | | माजी मंत्री मा.श्री झियाउद्दीन अब्दुल रहीम सिद्धीकी |
| आरोपी अटक व दिनांक | :— | मुख्य आरोपी शिवाकुमार उर्फ शिवा बालकिशन गौतम, वय १८ वर्षे. **दिनांक:—११/११/२०२४ रोजी** |

**तपास कौशल्य :—** दिनांक १२/१०/२०२४ रोजी २१:३० वा.च्या सुमारास विदयमान आमदार श्री झिशान सिध्दीकी याच्या प्रिमायसेस नंबर १४, बिल्डींग नं.३५, खेरनगर, निर्मलनगर, मुंबई या ठिकाणच्या ऑफीसपासुन १०० ते १५० फुट अंतरावरील राम मंदीराच्या जवळील टॅक्सी स्टॅडवर एका अनोळखी इसमाने फटाका सदृ य वस्तु फोडुन व इतर दोन अनोळखी इसमांनी माजी मंत्री मा.श्री. झियाउद्दीन अब्दुल रहीम सिद्धीकी उर्फ बाबा सिद्धीकी यांच्यावर अग्नीशस्त्रातुन अंदाधुंद गोळीबार करून त्यांना जीवे ठार मारले. सदर गोळीबारामध्ये तेथील एक इसम देखील गंभीर जखमी झाला. त्यावरून तीन अनोळखी इसमांनी अज्ञात कारणावरून माजी मंत्री मा.श्री झियाउद्दीन अब्दुल रहीम सिद्धीकी उर्फ बाबा सिद्धीकी यांच्यावर

अग्नीशस्त्रातुन अंदाधुंद गोळीबार करून त्यांना जीवे ठार मारले व एका इसमास गंभीर जखमी करून इतरांच्या जीवीतास धोका निर्माण केला अशी फिर्याद श्री. याम मगन सोनवणे, हिं/४७ वर्षे, धंदा – नोकरी यांनी तक्रार दिल्यावरून तीन अनोळखी आरोपीत इसमाविरोधात निर्मलनगर पोलीस ठाणे गु.र.क्र.५८९/२०२४ कलम कलम १०३(१), १०९, १२५, ३(५) बी.एन.एस.सह कलम ३, २५, ५, २७ भारतीय शस्त्र अधिनियम सह कलम ३७, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदरचा गुन्हा मा.वरि ठांनी गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे पुढील तपासकामी वर्ग केला. सदर गुन्हयाची गु.प्र.शा., गु.र.क्र.८६/२०२४ अन्वये घेण्यात आली.

सदर गुन्हयामध्ये माजी मंत्री मा.श्री झियाउद्दीन अब्दुल रहीम सिद्धीकी उर्फ बाबा सिद्धीकी यांना जीवे ठार मारण्यात आले होते व एका इसमास गंभीर रित्या जखमी करण्यात आले होते. सदर मयत माजी मंत्री होते व ते विदयमान आमदार झिशान सिद्धीकी यांचे वडील आहेत. सदर गुन्हा केल्यानंतर तीनही अनोळखी आरोपीत इसम हे पळुन जात असताना दोन अनोळखी आरोपीत इसमांना पकडण्यात यश आले होते. परंतु तिसरा आरोपीत इसम हा घटनास्थळावरून पळुन जाण्यात यशस्वी झाला होता. पकडण्यात आलेल्या दोन आरोपींकडुन पळुन जाणारा तिसरा आरोपी इसम हा शिवकुमार गौतम, वय– १९ वर्षे असा असल्याची माहीती प्राप्त होवुन ते तिघेही लॉरेन्स बिश्नोई गॅग चे सदस्य असल्याची माहीती प्राप्त झाली. सदर गुन्हयामध्ये लॉरेन्स बिश्नोई गॅगचा सहभाग दिसुन येत असल्याने तसेच सदर गुन्हयामध्ये माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचा मृत्यु झालेला असल्याने मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई यांनी गुन्हयाची गंभीरता ओळखुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या तसेच फायरिंग करून पळुन जाणारा मुख्य आरोपी नामे शिवकुमार गौतम याचा शोध घेण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याबाबत मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) याच्या मार्गदर्शनाखाली मा.पोलीस उप आयुक्त, (प्रकटीकरण) गुन्हे ाखा, मुंबई यांच्या सुचनेप्रमाणे तपास चालु केला. त्याकरीता पोलीस उप आयुक्त, (प्रकटीकरण) गुन्हे शाखा, मुंबई यांनी विविध पथके तयार केली. सदर पथकांकडुन सी.सी.टी.व्ही फुटेज पाहणे, आरोपीबाबत गोपनीय माहीती प्राप्त करणे, आरोपीचा तांत्रिक तपासाद्वारे शोध घेण्याचे प्रयत्न चालु झाले.

सदरवेळी तपास पथकातील स.पो.नि.माळी, पो.उप.नि.काळे, पो.शि. ०४०४६४/सावंत, पो.शि.क्र.०९१५९२/चव्हाण या पथकाने घटनास्थळावरील सि.सी. टि.व्ही.फुटेज पाहण्यास सुरूवात केली. त्यावेळी घटनास्थळावरून तीन अनोळखी इसम एका मागोमाग पळुन जाताना दिसुन आले. परंतु त्यांच्या कपडयांचे वर्णन कळुन येत नव्हते. त्यामुळे सदर तीनही आरोपी घटनास्थळावर कधी आले ते घटनेच्या पुर्वीचे सी. सी.टि.व्ही.पाहुन उजेडातील त्यांचे कपडे पाहुन त्या वर्णनाच्या कपडयातील पळुन जाणा–या तिस–या आरोपीत इसमाचा शोध घेण्यास सुरूवात केली. परंतु तरी देखील त्या कपडयातील वर्णनाचा इसम सि.सी.टि.व्ही.फुटेजमध्ये दिसुन येत नव्हता. रात्रीची वेळ असल्याने सि.सी.टि.व्ही. कॅमेरामध्ये स्प टता दिसुन येत नव्हती. त्यामुळे पुन्हा बारकाईने सि.सी.टि.व्ही. फुटेजची पाहणी केली असता त्यामध्ये पळुन जाणारा आरोपी नामे शिवकुमार गौतम याच्या सारखा दिसणारा व्यक्ती घटनास्थळापासुन ठरावीक अंतरावर दिसुन आला. परंतु त्याने घटनेपुर्वी घातलेले कपडे व घटनेनंतरचे कपडे यामध्ये बदल झालेला होता. त्यानंतर सदर सी.सी.टि.व्ही. फुटेजमधील संशयीत व्यक्तीची खात्री करून घेतली असता तोच पाहीजे आरोपी शिवकुमार गौतम असल्याचे

निष्पन्न झाले. त्यावरून सदर आरोपीने घटनेनंतर ओळख पटु नये म्हणुन कपडे बदलले असल्याचे नि  पन्न झाले. त्यानंतर सदर पथकाने सदर आरोपी शिवकुमार गौतम हा जातानाच्या मार्गावरील सि.सी.टि.व्ही. फुटेज पाहण्यास सुरूवात केली. परंतु तो पुढे सि.सी.टि.व्ही. मध्ये दिसुन येत नव्हता. त्यामुळे सदर पथकाने जवळ असलेल्या रेल्वेस्टेशन वरील सि.सी.टी.व्ही. फुटेज पाहण्यास सुरूवात केली. त्यावेळी तो दिनांक १२/१०/२०२४ रोजी रात्री १०:३० वा.सुमारास कुर्ला रेल्वे स्टेशन येथील प्लॅटफॉर्म क्र.१ वरून चालत चालल्याचे दिसुन आले. त्यानंतर सदरवेळी तो कल्याणच्या दिशेने जाणारी लोकल रेल्वेमध्ये बसुन जाताना दिसुन आला. त्यावरून तो पुढे कोठे उतरतो हे पाहण्याकरीता सदर लोकल रेल्वेचे पुढे कुर्ला स्टेशन नंतरचे थांबे असलेले घाटकोपर— विक्रोळी— कांजुरमार्ग— भांडुप—मुलुंड—नाहुर— ठाणे येथील सी.सी.टि.व्ही.फुटेज तपासले असत तो ठाणे रेल्वे स्टेशन येथे उतरल्याचे दिसुन आले.

त्यानंतर ठाणे रेल्वे स्टेशन येथुन तो रात्री ११:३० वा. सुमारास सोलापुर ला जाणा—या सिध्देश्वर एक्सप्रेसमधील जनरल डब्यामध्ये बसुन जाताना दिसुन आले. त्यावरून सिध्देश्वर एक्सप्रेसचे थांबे असलेले कल्याण जंक्शन—कर्जत जंक्शन—लोणावळा जंक्शन— पुणे जंक्शन येथील सी.सी.टि.व्ही. फुटेज तपासले असता तो पुणे जंक्शन येथे दि.१३/१०/२०२४ रोजी ०२:४० वा.सुमारास उतरून जंक्शन बाहेर जाताना दिसुन आले. त्यानंतर सदर परिसरातील सी.सी.टि.व्ही.कॅमेरे पाहत असताना तो सकाळी ०४:३० वा. पर्यंत पुन्हा पुणे रेल्वे स्टेशन मध्ये आल्याचे दिसुन आले. त्यानंतर बारकाईने पाहणी केली असता तो गोवा ते दिल्ली असा प्रवास करणा—या गोवा एक्सप्रेसमध्ये जनरल डब्यामध्ये सकाळी ०५:०० वा सुमारास बसुन गोवा एक्सप्रेसने गेल्याने दिसुन आले. त्यामुळे सदर पथकाने वरि  ठांच्या सुचनेप्रमाणे गोवा एक्सप्रेसच्या मार्गावरील रेल्वे स्टेशनचे फुटेज पाहण्यास सुरूवात केले. त्यानुसार सदर पथकाने गोवा एक्सप्रेसचे थांबे असलेले पुण्याच्या पुढचे दौंड—अहमदनगर—बेलापुर— कोपरगाव— मनमाड— जळगाव—भुसावळ—खांडवा—हारडा—इटारसी—भोपाळ— झांसी येथील सि.सी.टि.व्ही. एक—एक करून पाहण्यास सुरूवात केली. त्यांपैकी तो जळगाव व भोपाळ रेल्वेस्टेशन वर उतरून पुन्हा त्याच रेल्वेमध्ये बसल्याचे पुन्हा लगेच बसल्याचे दिसुन आले. परंतु झांसी रेल्वेस्टेशन येथे दि.१४/१०/२०२४ रोजी रात्री ००:३० उतरल्यानंतर तो पुन्हा त्या रेल्वे मध्ये न बसता तो तिकीट काउंटर कडे गेल्याचे दिसुन आले. त्यानंतर सदर वेळी त्या ठिकाणचे बारकाईने सी.सी.टी.व्ही.फुटेजची पाहणी केली असता तो झाशी येथे दि.१४/१०/२०२४ रोजी रात्री ०१:०० वा सुमारास पु  पक एक्सप्रेसमध्ये बसल्याचे दिसुन आले. त्यामुळे सदर पथकाने पु  पक एक्सप्रेसचे झांसीच्या पुढील असलेले ओराई जंक्शन— कानपुर जंक्शन—उन्नाव जंक्शन—लखनौ जंक्शन येथील थांब्यावरील सि.सी.टि.व्ही.फुटेज एक—एक करून पाहीले असता तो दि. १४/१२/२०२४ रोजी सकाळी ०७:०० वा. लखनौ रेल्वे जंक्शन येथे उतरून बाहेर गेल्याचे दिसुन आले.

त्यानंतर तो एका रिक्षामध्ये बसुन कैसरबाग बस डेपो, लखनौ येथे गेल्याचे दिसुन आले. सदर वेळी कैसरबाग बस डेपो मधील सि.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी केली असता त्याचे मुळ जिल्हा असलेल्या बहराईच ला जाणा—या तसेच बरेली ला जाणा—या बस उभ्या असतात त्या ठिकाणी तो फिरत असताना दिसुन आला. परंतु तो पुन्हा बस स्टॅड च्या बाहेर पडल्याचे दिसुन येत नव्हते. सदर वेळी नक्की बहराईच

कि बरेली जाणा—या बसमध्ये बसला हे समजुन येत नसल्याने सदर पथकाने बहराईच व बरेली मार्गावरून बसथांब्याचे सी.सी.टि.व्ही.कॅमेरे तपासले परंतु पाहीजे आरोपी कोठेही दिसुन आला नाही.

त्यानंतर मा.वरिष्ठांच्या सुचनेप्रमाणे पाहीजे आरोपी शिवकुमार गौतम याचे पुर्वीचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्याचे अवलोकन केले. त्यावरून त्याच्या कॉलर पैकी त्याचेजवळचे मित्र, नातेवाईक यांची माहीती प्राप्त केली. त्यानंतर पाहीजे आरोपी याचे असलेले मुळ गाव—गंडारा, ता.केसरगंज, जि.बहराईच या गावापासुन जवळ असलेली रहावयाची वेगवेगळी ठिकाणे बदलुन व पोलीस असल्याचे कळु न देता सतत २५ दिवस राहुन पाहीजे आरोपी याचे जवळचे १० ते १२ मित्र व १५ नातेवाईक यांची गोपनीय माहीती प्राप्त केली. त्यावेळी अशी माहीती प्राप्त झाली की त्याचे जवळचे ०४ मित्र नामे अनुराग कश्यप, ज्ञानप्रकाश त्रिपाठी उर्फ ओमु पंडीत, आकाश कुमार श्रीवास्तव, अखिलेंद्र प्रताप सिंह हे पाहीजे आरोपी शिवकुमार गौतम यास लपुन ठेवण्यास मदत करीत आहेत व ते देखील लॉरेन्स गॅगचे सदस्य आहेत. त्यावरून त्याचे पाहीजे आरोपीच्या नमुद ४ मित्रांचे सी.डी.आर. प्राप्त करून त्यांचे तांत्रिक विश्ले  ाण करण्यात आले. तसेच त्यांचेवर गोपनीय पाठलाग करून पाळत ठेवण्यात आली.

त्यादरम्यान गोपनीय माहीती प्राप्त झाली की वर नमुदचे ४ मित्र हे पाहीजे आरोपी शिवकुमार गौतम यास भेटण्यास जाणार आहेत. त्याप्रमाणे दि. ०७/११/२०२४ रोजी नमुद चे चारही मित्र त्यांचे मोबाईल बंद करून बहराईच जिल्हयातील एका पहाडी जागेकडे गेल्याचे निष्पन्न झाले. परंतु ते कोठे गेले याबाबत स्पष्टता येत नव्हती. त्याप्रमाणे सदरची माहीती वरिष्ठांना दिली असता मा.वरिष्ठांनी मुंबईहुन आणखी पोलीस पथक पाठवुन चारही मित्र ज्या मार्गाने येतील त्या मार्गावर सापळा लावुन त्यांना ताब्यात घेण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे सलग तीन दिवस त्यांच्या येण्याच्या मार्गावर सापळा लावुन ते चारही मित्र दि. १०/११/२०२४ रोजी तेथुन पाहीजे आरोपी शिवकुमार गौतम सह जात असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले.

सदर वेळी शिवकुमार गौतम याचेकडे व त्याचे ०४ मित्र नामे अनुराग कश्यप, ज्ञानप्रकाश त्रिपाठी उर्फ ओमु पंडीत, आकाश कुमार श्रीवास्तव, अखिलेंद्र प्रताप सिंह यांचेकडे केलेल्या तपासात त्यांचा गुन्हयात सहभाग नि  पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेवुन गुन्हे शाखा, मुंबई येथे आणण्यात आले.

तरी गुन्हे शाखेमधील अधिकारी व अंमलदार यांनी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार माजी मंत्री यांच्यावर अग्नीशस्त्राने फायरिंग करून त्यांचा खुन करून पळुन गेलेला गंभीर गुन्हयातील मुख्य आरोपी शिवकुमार गौतम, वय—१९ वर्षे हा मुंबई—ठाणे— पुणे— अहमदनगर— जळगाव— भोपाळ— झांसी— कानपुर— लखनउ अशा विविध मार्गे विविध रेल्वे बदलुन त्याचे मुळ गावाकडे गेल्याचे रेल्वेस्टेशनवरील व प्रायव्हेट सी.सी.टि.व्ही. (साधारण १५०० किलोमिटर अंतराचे) कॅमेरे पाहुन निष्पन्न केले. तसेच त्यानंतर मुख्य आरोपी शिवकुमार गौतम व त्याचे साथीदार आरोपी नामे अनुराग कश्यप, ज्ञानप्रकाश त्रिपाठी उर्फ ओमु पंडीत, आकाश कुमार श्रीवास्तव, अखिलेंद्र प्रताप सिंह यांना ताब्यात घेण्याकरीता पोलीस पथकाने परराज्यात सलग २७ दिवस राहुन मुख्य आरोपीच्या नमुद साथीदारांवर पाळत ठेवली तसेच तांत्रीक तपास व गोपनीय माहीती प्राप्त करून त्यावरून आरोपींचा ठाव ठिकाणा कौशल्यापुर्वक शोधुन

त्यांस ताब्यात घेऊन मुख्य फायरिंग करणारा तसेच त्याचे इतर ०४ साथीदार आरोपी यांना अटक केली आहे.

सपोआ. डी. स्पेशल , गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहाय्यक पोलीस आयुक्त | श्री किशोरकुमार केशव शिंदे (डी. स्पेशल.) | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री अमोल माधव माळी ( कक्ष— ५) | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. रामदास तात्याबा कदम (खंडणी विरोधी पथक) | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | श्री.स्वप्निल रामदास काळे ( कक्ष— ७) | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह. ०५००८९ | निलेश रघुनाथ शिर्के(सी.आय. यु.) | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि. ०९०४६४ | महेश वसंत सावंत, ( कक्ष— ७) | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.शि. ०९१५९२ | विकास अंतु चव्हाण ( कक्ष— ७) | प्रशस्तीपत्रक |

## २) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर —२०२४

| | | |
|---|---|---|
| ०२ | सांताक्रुझ पोलीस ठाणे,परिमंडळ—९, मुंबई | गु.र.क्र. १२९७/२०२४ कलम १३७(२), १०३ भारतीय न्याय संहिता २०२३ सह कलम ८, १२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ |

—:"फुस लावनु कायदेशीर पालकांचे ताब्यातुन पळवून नेले, निर्घुण हत्या व लैंगिक अत्याचार ":—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयातील नमूद गुन्हयात दि ०७/११/२०२४ रोजी फिर्यादी हे त्यांचे पत्नी व मुलांबाळांसह छटपुजेसाठी जूहू चौपाटी याठिकाणी गेल्या होत्या. छट पुजा आटोपुन परत घरी आल्यावर त्यावेळी त्यांचा मुलगा नामे दिलखुश हा बाहेरूनच कूठेतरी निघून गेला. त्याचा शोध घेतला परंतु तो कुठेही मिळून आला नाही. म्हणून अपहरण झाल्याबाबतची कलम १३७ (२) बी.एन.एस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

दिनांक ११/११/२०२४ रोजी कंट्रोलकडून कॉल प्राप्त झाला की, गजधर बांध येथे एक लहान मुलाचा सडलेला मृतदेह शॉपच्या पत्र्यावर मिळाला आहे. त्यानुसार सदर मृत्युदेहाची शहानिशा केली असता या गुन्हयातील अपहरण झालेल्या बालकाचा मृतदेह असल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयात कलम १०३ भारतीय न्याय संहिता २०२३ सह कलम ८, १२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२.अन्वये गुन्हयाच्या कलमात वाढ करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री अशोक बहूर महतो , वय — ३५ वर्षे |
| गुन्हा घडला दिनांक | | दि. ०७/११/२०२४ रोजी |
| गुन्हा दाखल दिनांक | | दि. ०८/११/२०२४ रोजी |
| बळीत/मयत | :— | |
| आरोपी अटक व दिनांक | :— | **महेश्वर दुर्योधन मुखिया वय ३१ वर्षे**<br>**अटक.दिनांक. १५/११/२०२४** |

**तपास कौशल्य :—** फिर्यादी नमूद गुन्हयातील फिर्यादी श्री अशोक बहूर महतो ,वय — ३५ वर्षे, व्यवसाय — रिक्षाचालक, रा.ठी — जुह कोळीवाडा, भैय्यावाडी , सांताक्रुझ पश्चिम मुंबई — ५४ नमुद पत्यावर सात वर्षापासुन कुटुंबासह रहावयास आहे. त्यांचे सोबत त्यांची पत्नी नामे पुनम देवी, वय ३२ वर्षे, मुलगी सोनी वय १३ वर्षे, काजल वय १५ वर्षे, व मुलगा नामे नामे दिलखुश वय — ०९ वर्षे असे रहावयास आहेत. फिर्यादी हे सांताक्रुझ परिसरामध्ये रिक्षा चालवायचे काम करीत असून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नामधून त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह चालवितात.

दि ०७/११/२०२४ रोजी छट पुजा असल्याकारणाने फिर्यादी यांची पत्नी या त्यांच्या मुलांबाळांसह साधारणत: सायंकाळी ०५:०० वा च्या सुमारास छटपुजेसाठी जूहू चौपाटी याठिकाणी गेल्या होत्या. छट पुजा आटोपुन त्या मुलांसह रात्री ०६:३०

वा परत घरी आल्या. सदरवेळी फिर्यादी यांची पत्नी घरी गेली व त्यांचा मुलगा नामे दिलखुश हा बाहेरूनच कूठेतरी निघून गेला. सदरवेळी त्यांनी सगळयांनी दिलखुश याचा चौपाटीवरती शोध घेतला परंतु त्यांचा मुलगा दिलखुश कुठे मिळून आला नाही. म्हणून त्यांचा मुलगा दिलखुश हरविलेबाबत तक्रार देण्यास पोलीस ठाणेस आले असता त्यांचा सविस्तर जबाब नोंद करण्यात आला.

अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलाचे वर्णन — कु. दिलखुश अशोक महतो , वय — ०९ वर्षे, रा.ठी — जुह कोळीवाडा, भैयावाडी, सांताक्रझ पश्चिम मुंबई — ५४ नेसणीस — लाल रंगाचा टी शर्ट व काळया रंगाची जीन्स पॅन्ट, रंग — सावळा, बांधा —सडपातळ, उंची — ३.५ फुट , केस — छोटे कापलेले, अवगत भाषा — हिंदी

सदरच्या परिस्थतीचे व घटनेचे गांभिर्य ओळखुन सांताक्रुझ पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वेभव शिंगारे, यांच्या सुचनेप्रमाणे प्राधान्याने सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे नमुद फिर्यादी यांच्या जबाबावरुन गु र क्र १२९७/२४ कलम १३७ (२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयातील फिर्यादी यांचा एकुलता एक मुलगा मिळून येत नाही या घटनेमुळे प्रचंड मानसिक धक्का बसला होता. अशा परिस्थितीत त्यांच्याकडुन यातील पाहिजे अनोळखी आरोपितांबाबत उपयुक्त माहिती मिळविणे खुपच अवघड व दुरापास्त झाले होते. त्यामुळे यातील पाहिजे आरोपितांची नांवे व पत्ते निष्पन्न करुन त्यांना गुन्हयात अटक करणे हे फार मोठे आव्हान पोलीसांसमोर उभे ठाकले होते. तसेच सदरचा गुन्हा हा अत्यंत संवेदनशिल व गंभीर असल्यामुळे त्यातील आरोपितांना लवकरात लवकर अटक करुन तो उघडकीस आणणे अत्यावश्यक होते.

त्या अनुषंगाने मा. अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई श्री परमजीत सिंग दहिया सो. परिमंडळ—९ चे मा. पोलीस उप—आयुक्त श्री. दिक्षित गेडाम सो, तसेच सांताक्रुझ विभागाचे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. मारूती पंडीत सो यांच्या देखरेखीखाली व सांताक्रुझ पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली यातील पाहिजे अनोळखी आरोपितांचा शोध घेण्याकरीता सांताक्रुझ पोलीस ठाणे स्तरावर म.पो.नि.ज्योती हिबारे व पो.नि. रणजित आंधळे यांचे नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या दोन्ही सत्रातील पोलीस अधिकारी व अंमलदारांचे विशेष पोलीस पथक तयार करण्यात आले व त्यांच्या मार्फतीने यातील पाहिजे आरोपितांचा शोध सुरु करण्यात आला.

सदरच्या विशेष पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी एकत्रितरित्या अहोरात्र मेहनत घेवुन पाहिजे आरोपितांची ओळख पटविण्याचा कोणताही सुगावा हाती नसताना दिनांक ११/११/२०२४ रोजी कंट्रोलकडून कॉल प्राप्त झाला की, गजधर बांध येथे एक लहान मुलाचा सडलेला मृतदेह शॉपच्या पत्र्यावर मिळाला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी पोलिस ठाणेचे सर्व वरिष्ठ अधिकारी व दोन्ही गुन्हे प्रकटीकरण अधिकारी हे गुन्हे प्रकटीकरण पथकासह घटनास्थळावर जाऊन आजूबाजूचे तसेच घटनास्थळावरील सीसीटीविचे फुटेज ताब्यात घेऊन पुढील तपास चालू

करण्यात आला.

सदरच्या मृतदेहावरील कपडे व अपहरण झालेल्या बालकाचे कपडे हे एक सारखे दिसून येत असल्याने सदरचा मृतदेह हा त्या अपहरण केलेल्या बालकाचा असू शकतो , त्यानुसार तपास चालू केला. त्याप्रमाणे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता एक इसम अपहरण झालेल्या बालकास दिनांक ०७/११/२०२४ रोजी सायंकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास घटनास्थळाच्या बाजूस असलेल्या गारमेंटच्या शिडीवरून वरती आणताना दिसून आला. त्यानंतर एका तासाने सदरचा इसम हा एकटाच खाली उतरताना दिसून आला. त्याकरीता आजूबाजूचे सीसीटीव्ही तपासले असता सदरचा इसम हा खांद्यावर पाईप घेऊन जाताना दिसून आला.

सदरचा इसमाची ओळख पटवणेसाठी गझधरबांधच्या आजूबाजूचे परिसरातील गारमेंट कारखाना तसेच गॅरेजमधील लोकांना सीसीटीव्ही दाखवले असता त्यातील एका गारमेंट वाल्यानी सदरच्या इसमास ओळखले व सांगितले की सदरचा इसम हा त्यांच्याकडे काम करीत असून तो दिनांक ७/११/२०२४ रात्री ०९.३० वाजले पासून कोणास काहीही न सांगता परस्पर कोठेतरी निघून गेला आहे.

त्यानुसार सदर इसमाचा मोबाईल नंबर प्राप्त करून सीडीआर प्राप्त केला असता त्याने ३/११/२०२४ रोजीपर्यंत फोनचा वापर केल्याचे दिसून आले. त्याकरीता त्याच्या IMEI चा CDR प्राप्त केला असता त्यात त्याचा नविन मोबाईल नंबर मिळून आला, परंतु तो मोबाईल नंबर ५/११/२४ रोजीपासून बंद असल्याचे दिसून आले. त्यात आरोपीचा नवीन IMEI प्राप्त झाल्याने त्याचा CDR प्राप्त केला असता तो मोबाईल फोन हा आरोपीने मित्रास विक्री केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पाहिजे आरोपीची गुप्त खबऱ्यामार्फत माहिती प्राप्त करून तो राहत्या गावी २ दिवसांपूर्वी दिसून आल्याचे समजले. त्याकरीता मा. वरिष्ठांच्या परवानगीने आरोपीची सर्व माहिती घेऊन स.पो.नि सावंत, पो.शि.क्र ०९०६१३/ हिरेमठ, पो.शि.क्र ०९२३७१/ गावडे असे पथक मा. वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली पाठविण्यात आले.

पोलीस पथक हे ग्राम – भेजा, जिल्हा – मधुबनी, राज्य – बिहार येथे तपासकामी गेले असता सदर गावामध्ये भरपूर प्रमाणात भात शेती असल्याने दूर दूर पर्यंत घरे दिसत नव्हती, त्याकरीता आरोपीचे शोध घेणे फार कठीण होते. त्याकरीता स्थानिक भेजा पोलिस ठाणेची मदत घेण्यात आली. त्याप्रमाणे भेजा पोलीस ठाणेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचेमार्फत गुप्त खबऱ्यामर्फत माहिती प्राप्त करून सदर परिसराची सायंकाळच्या वेळेस रेकी करण्यात आली. त्यानंतर रात्रीच्या वेळेस 2km धुक्यांमधून पायी जाऊन दिनांक १५/११/२०२४ रोजी आरोपीस ताब्यात घेतले. त्यानंतर त्यास पोलीस ठाणेस आणून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपीकडे तपास केला असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्याकरीता आरोपीस नमूद गुन्ह्यांत अटक करण्यात आलेली आहे. त्यानंतर सदर आरोपीचा ट्रान्झिट रिमांड घेऊन त्यास मुंबई येथे पुढील तपासकामी घेऊन आले.

घटनास्थळी प्राप्त करण्यात आलेले सी.सी. टी.व्ही. फुटेजचे सातत्याने

बारकाईने निरीक्षण केले व त्याबाबत पाठपुरावा केला व तांत्रिक दृष्टया मिळालेल्या माहितीचा कौशल्यपुर्वक वापर करुन आरोपीतास त्याचे राहते गावी ग्राम – भेजा, जिल्हा – मधुबनी, राज्य – बिहार येथून नियोजनबध्द सापळा रचुन नमुद गुन्हयात दि. १५/११/२०२४ रोजी गुन्हयाच्या तपासकामी ताब्यात घेतले.

सदर इसमांकडे विशेष पोलीस पथकाने गुन्हयाच्या अनुषंगाने कसुन तपास केला असता सदर इसमांनेच नमुद गुन्हा केल्याचे व यातील बळीत मुलगा सुध्दा बिहारी असल्याचा गैरफायदा घेवुन त्याला खाण्याकरीता वेफर्सचे पाकिट घेवून दिले व त्यास फिरायला चल असे सांगून आई–वडीलांच्या कायदेशिर रखवालीतून फुस लावून पळवून नेल्याचे कबुल केले. तसेच त्याने बळीत मुलावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला असता तो ओरडू लागल्याने त्याची हाताने गळा दाबून निर्घुण हत्या केली. त्यामुळे सदर आरोपी इसम नामे महेश्वर दुर्योधन मुखिया, वय – ३१ वर्ष रा.ठी. ग्राम – भेजा, जि. मधुबनी राज्य – बिहार यास नमुद गुन्हयात दि. १५/११/२०२४ रोजी ०९.५० वा. अटक करण्यात आली व सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

नमुद गुन्हयाचे तपासात आरोपी नामे महेश्वर दुर्योधन मुखिया वय ३१ वर्षे याची दोन पंचांसमक्ष दोन साक्षीदारांच्या (निवेदन पंचनाम्याअंतर्गत निष्पन्न झालेले दुकानदार) मार्फतीने ओळख परेड घेतली. ओळखपरेड मध्ये आरोपी महेश्वर यास दोन्ही साक्षीदारांनी बरोबर ओळखले आहे. तसेच आरोपी बळीत मुलासह पायऱ्या चढून जाताना गॅरेज मध्ये काम करणाऱ्या साक्षीदारांनी पाहिले असल्याने त्यांचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १८३ अन्वये कबुली जबाब नोंदविण्याकरीता मा. ७१ वे न्यायालयास विनंती करण्यात आली आहे.

**सांताक्रुझ पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री वैभव कांतीलाल शिंगारे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री रणजित सुर्यकांत आंधळे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री ज्योती दत्तात्रय हिबारे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री.तुषार हरिश्चंद्र सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री.धनंजय लक्ष्मण आव्हाड | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री.सुयोग तुकाराम अमृतकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री.नारायण रावसाहेब नवले | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री.गणेश नागनाथ जैन (जुहू पो. ठाणे) | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरीक्षक | श्री.शशिकांत तानाजी इंगवले | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | श्री. जितेन बाळाराम गांवकर | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो ह क्र.९६०६५३ | श्री.नेताजी तानाजी कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ००१२१ | नितिन आत्माराम केणी | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | पो.ह.क्र. ०१६९७ | जुबेर हमीद सालदुरकर | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. ०३४५६ | गणेश जनार्दन बागवे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. ०६१६२६ | गणेश नंदकुमार हंचनाळे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र. ०९०६१३ | नरेंद्र सुर्यकांत हिरेमठ | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र. ०९१६०६ | श्रीनिवास बाबू चिला | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र. ०९२५०८ | किरण गोवर्धन सावकारे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. ०९३२३७ | मनोज शंकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र. ०८०११९ | मलकप्पा हनुमंत कनमुसे (जुहू पो. ठाणे) | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.क्र. ०९०३१६ | तुषार आनंदराव पन्हाळे (जुहू पो.ठाणे) | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र. १४१६९३ | योगेश बबन बोडके (जुहू पो.ठाणे) | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक ०२/०४/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या " **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे नोव्हेंबर —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर — २०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | व्ही.पो.रोड पोलीस ठाणे, परिमंडळ—२, मुंबई | गु.र.क्र.३२/२०२२ कलम ३०२ भा.दं.वी.सं |

—: " पैशाच्या वादावरून खुन ":—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील अटक आरोपी मनोज मन्साराम मरसकोल्हे ,वय ३५ वर्षे याने मयत इसम अर्जून यशवंत सिंह सरहार, अंदाजे ४६ वर्ष यांच्याशी झालेल्या पैशाच्या वादावरून त्यांचे डोक्यात सिमेट ब्लॉक मारून डोक्याला जबर दूखापत करून रक्तस्त्राव झाल्याने अर्जून सरहार यांच्या मृत्युस कारणीभूत आला झाला म्हणून कलम ३०२ भादवि अन्वये गून्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री विजय सहदेव भणगे, ४३ वर्ष |
| बळीत | :— | अर्जून यशवंतसिंग सरहार ४० वर्ष |
| निकाल दिनांक | :— | दिनांक ०८/११/२४ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | मनोज मन्साराम मरसकोल्हे ३५ वर्ष,<br>अटक दि—०४/०३/२०२२ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्यातील आरोपी नामे मनोज मन्साराम मरसकोल्हे ३५वर्ष ,यास दिनांक ०८/११/२४ रोजी मा. सत्र न्यायालय कोर्ट क्र २३ यांनी आरोपीतास जन्मठेपेची शिक्षा व रूपये ०२ हजार दंडाची अशी शिक्षा सुनावण्यात आली |

**तपास कौशल्य** :— नमूद गुन्हयत कायद्यातील तरतुंदीनुसार जास्तीत जास्त शिक्षा व्हावी म्हणून गुन्हयाचा सर्वांगिण तपास करुन अल्पावधीत विक्रमी वेळेत दोषारोपपत्र सादर करण्यासाठी तपासी अधिकारी:— पोलीस निरीक्षक अविनाश बाळकृ ण मांदळे यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यानंतर सन्माननीय न्यायालयात खटला चालवितांना साक्षीदारांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. साक्षीदारांना नेमलेल्या वेळी न्यायालयात हजर ठेवणे, साक्षीदारांच्या तोंडी पुराव्याशी सुसंगत होतील असे दोषारोपातील योग्य व महत्वाचे दस्तऐवजी पुरावे व हस्तगत करण्यात आलेले वस्तू पुरावे माननीय न्यायालयाकडे सादर करण्याकामी सरकारी वकिलांना मदत करणे अशी अनेक कामें करतांना बाजूस पैरवी अधिकारी व अंमलदारांनी वेळोवेळी योग्य जागरुकता व समयसुचकता दाखविली व खटल्याचे काम अभियोग पक्षाच्या बाजूने विनाविलंब पार पाडण्यात महत्वाची भुमिका बजावली. त्यामुळे हा खटला अल्पावधीत व विक्रमी वेळेत संपला. तपासी पथकाने सादर केलेल्या सबळ पुराव्याच्या आधारावर मा. न्यायालयाने यातील अटक आरोपींना कायद्यातील तरतुदींनुसार जास्ती जास्त म्हणजे मरेपर्यंत कारावास शिक्षा सुनावली.

**व्ही.पी रोड पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरिक्षक | श्री.अविनाश बाळकृष्ण मांदळे, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस उप निरीक्षक | श्री.शांताराम काशिनाथ घुगे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.ह.क्र. ४०२५१ | निशा काशिनाथ चोरगे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.शि.क्र. ११०७८४ | देविदास हिरामल गवारी | प्रशस्तीपत्रक |

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर — २०२४

| ०१ | डोगरी पोलीस ठाणे, मुंबई | १८१/२०१८ कलम—३०२, ७५ भादवि सह कलम—३७(१) सह १३५ मपोका |
|---|---|---|

—: '' जीवे ठार मारणे_'':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद दि.२४/८/१८ रोजी यातील अटक आरोपीने फिर्यादी श्रीमती परवीन सलीम शेख वय—४० वर्षे यांच्या मुलास ठेवलेल्या स्त्रीला आई म्हणावे परंतु त्यांस मयत इसमाने नकार दिला याचा राग येवुन आरोपीने प्रथम हाताने व नंतर कोणत्या तरी धारदार हत्याराने त्याच्या गळयावर उजव्या बाजुस वार करून त्यांस गंभीर जखमी करून ठार मारले सदरचा गुन्हा नोंद केला होता

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती परवीन सलीम शेख वय—४० वर्षे |
| बळीत | :— | इम्रान सलीम शेख वय—२३ वर्षे |
| निकाल दिनांक | :— | २५/११/२४ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | **सलीम इब्राहिम शेख उर्फ सलीम मद्रासी वय ४१ वर्षे अटक दि—२४/०८/२०१८ रोजी** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्यातील आरोपी नामे सलीम इब्राहिम शेख उर्फ सलीम मद्रासी वय ४१ वर्षे यांस दि.२५/११/२४ रोजी रोजी मा. १० वे सत्र न्यायालय, मुंबई यांनी आरोपीस जन्मठेपेची शिक्षा व रूपये १० हजार दंडाची शिक्षा दंड न भरल्यास ६ महिन्याचा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयाचे गुन्हयात वापरलेले हत्यार हस्तगत करून आरोपीने गुन्हा करतेवेळी अंगावर परिधान केलेले कपडे सीएला पाठविले त्याचा पॉझीटिव्ह रिपोर्ट प्राप्त केला पंच साक्षीदारांनी जबाब दिले पीएम करणारे डॉ.गायकवाड यांनी त्यांची साक्ष उत्कृष्टपणे दिली पैरवी अधिकारी व त्यांचे दोन सहकारी यांनी मुद्येमाल हजर केला. साक्षीदारांवर समन्सची बजावणी करून त्यांना साक्षकामी हजर ठेवले. फिर्यादी यांनी आपली साक्ष फिरविल्या नंतर पैरवी अधिकारी व कोर्ट कारकुन यांनी सरकारी वकीलाच्या मार्फतीने सर्व पुरावे मा. न्यायालयात सादर केले.

**डोंगरी पोलीस ठाणे, मुंबइ तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक सेवानिवृत्त | मेहन दत्तात्रय.येडुरकर | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | स्नेहलसिंह रमेश खुळे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | सोपान काशीराम कदम | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सफौक्र ३२१८८ | अनंत मुरारी पार्टे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोहक्र ९७१०२१ | अविनाश श्रीरंग बागल | प्रशस्तीपत्रक |